CNR - MHKO130000702021

मुमताजबी नायकवडी विरुध्द यशवंत पाटील

## नियमित दिवाणी कज्ञा नं. १६/२०२१ मधील नि.क्र. २६ खालील आदेश

१. सदरचा अर्ज वादी यांनी त्यांच्या दावा दुरुस्तीकरीता सी.पी.सी. ऑर्डर ६ रुल १७ व ऑर्डर १ रुल १० नुसार दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, सदर दावा मिळकत क्र. १-ब, सि.स.नं. २५४८ चे मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ चे पूर्वहक्कदार पारुबाई भ्र. मारुती पोवार यांचे व्यतिरिक्त मयत महादू रामा तेली हे ही सहहिस्सेदार आहेत. तथापि, वादीचा प्रस्तुतचा दावा हा सि.स.नं. २५४८ चे मिळकतीसंदर्भात हक्कज्ञापनाचा असलेने प्रस्तुत दाव्यामध्ये काही तांत्रिक दोष राहू नये याकरीता सदर मयत सहहिस्सेदार महादू रामा तेली यांचे वारसांना प्रस्तुत दावेमध्ये प्रतिवादी म्हणून सामील करण्याकरीता तसेच त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज केला.

३. त्याप्रमाणे दावा अर्जाच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. ३-अ व ३-ब अशी अर्जामध्ये नमुद वारस प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याकरीता, तसेच दाव्यातील परिच्छेद क्र. ५ मध्ये ओळ क्रमांक ३ व ११ मध्ये मयत महादू तेली यांच्या वारसा संदर्भातील मजकूर समाविष्ट करण्याकरीता विनंती केली आहे. वादीच्या कथनानुसार, सदर दुरुस्तीमुळे वस्तुस्थिती अभिलेखावर येवून दावा न्यायनिर्णय करणे सुलभ होणार असलेने प्रतिवादीस कोणताही पूर्वग्रह होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

४. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे उत्तर दाखल केले असून अर्जात नमुद व्यक्ती हे आवश्यक पक्षकार नाहीत. तसेच त्यांचेविरुध्द कोणतीही मागणी या अर्जामध्ये नमुद नाही. केवळ दावा प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज केला असून प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादी हे प्रस्तावित दुरुस्ती सुचवून मुळ दाव्याचे स्वरुप बदलू पाहत आहेत. तसेच दाव्यात मुद्दे निश्चित झाले असून वादी या टप्प्यावर दुरुस्तीस पात्र नसल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. कागदपत्राचे अवलोकन केले.

६. सदर प्रकरणाात मुद्दे निश्चित झाले आहेत. असे जरी असले तरी प्रकरणातील प्रतिवादी यांचा बचाव पाहता, व दाव्याचे स्वरुप व मयत महादू तेली याचे दावा मिळकत क्र. १-ब मधील अधिकार पाहता, त्यांच्या वारसांना या कामी पक्षकार करणे गरजेचे ठरते. तसेच तशा दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांच्या बचावावर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे वादी सुचवू पाहत असलेली दुरुस्ती ही मयत महादू तेली यांच्या दावा मिळकत क्र. १-ब मधील अधिकाराशी निगडीत असल्याने वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो. वादीने अर्जात नमुद मयत महादू तेली यांच्या वारसांना प्रतिवादी म्हणून दाखल करण्याची विनंती अर्जात मागणी केल्यानुसार मंजूर करण्यात येते. त्यानुसार वादीने दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती ठराविक वेळेत करुन दुरुस्ती प्रत विहीत मुदतीत दाखल करावी. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/-

कागल (बी.डी.गोरे)

दिनांकः- ०३/०१/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कागल.